**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 25/01/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 13 कि. मी. अंतरावर घोघरा महादेव मंदीर पेंच नदीच्या पाण्यात पारशिवनी येथे दिनांक 24/01/2021 चे 11.30 वा. दरम्यान अनुराग शिवराज श्रीवास(मृतक), वय 13 वर्ष हा आपल्या परीवारासह घोगरा घाट पेंच नदी पारशिवनी येथे पिकनिक करीता आला असता पेंच नदीच्या पात्रात सदर मृतक हा आंघोळ करीत असतांना पाण्यात बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शिवराज कपुरचंद्र श्रीवास, वय 41 वर्ष, रा. रावल अपार्टमेंट 8, लष्करीबाग नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप बासोडे हे करीत आहे.

2) पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत रानवाडी शिवार येथे दिनांक 24/01/2021 चे 05.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रमोद ओमकार खरपुरीया, वय 42 वर्ष, रा. रानवाडी ता. नरखेड व राजेन्द्र अजाबराव खरपुरीया(मृतक), वय 42 वर्ष, रा. रानवाडी ता. नरखेड यांचे शेत लागुन असुन ते नेहमी मोटार पंप चालु करण्याकरीता जात होते. मृतक हे शेताजवळ असलेल्या 01 नंबर रानवाडी तलाव येथे पेटी जवळ मोटार चालु करण्याकरीता गेले असता त्यांना इलेक्ट्रीक करंट लागल्याने त्यांना उपचाराकरीता दवाखाण्यात आणत असता त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रमोद ओमकार खरपुरीया वय 42 वर्ष रा. रानवाडी ता.नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ सातंगे हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावर के के नगर शितलवाडी रामटेक येथे दिनांक 23/01/2021 चे 04.00 वा. ते 04.30 वा. दरम्यान सौ. अर्चना नरेन्द्र फाले(मृतक), वय 42 वर्ष, रा. के. के. नगर शितलवाडी हिने झोपेतून उठून बाथरूम मध्ये जावून डबकीमधील रॉकेल अंगावर टाकुन स्वतःला पेटवून घेतले. तिचा प्राथमिक उपचार सरकारी दवाखाना रामटेक येथे करून पुढील उपचाराकरीता नंदनवन सेवन स्टार हॉस्पीटल नागपूर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दि. 23/01/2021 चे 23.30 वा. त्यांचा मृत्यु झाला. सदर मर्गाचे कागदपत्रे पोस्टे ला प्राप्त झाल्याने मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– नितीन मोरेश्वर कांबळे, वय 29 वर्ष, रा. कळमना नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा राजेन्द्र अडामे हे करीत आहे.

4) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर दुर्गा चौक पिपरी कन्हान येथे दिनांक 25/01/2021 चे 06.00 वा. ते 06.30 वा. दरम्यान सौ.अश्विनी गौरव भोयर (मृतक) वय 26 वर्ष रा.दर्गा चौक पीपरी कन्हान ही आपल्या घरी सकाळी पाणी गरम करण्यासाठी गेली असता तिला ईलक्ट्रीक करंट गिजर सुरु करण्यासाठी गेली असता तिला इलेक्ट्रीक करंट लागुन ती मरण पावली आहे. तसेच सदर मृतकाचे मागील 8 महिना पुर्वी लग्न रितीरिवाजाने झाले होते असे फिर्यादी चा तोंडी रिपोंर्ट वरुन सदर चा मर्ग दाखल करुन तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पवन सुर्यभान भोयर, वय 33 वर्ष, रा. दर्गा चौक पीपरी कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनि श्री शेख 9403692766 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर